आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२९ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अदानी लाच प्रकरणासह इतर मुद्यांबाबत विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळं संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर, पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला उपस्थित राहणार
- गेल्या 10 वर्षांत देशातला दहशतवाद, बंडखोरी आणि अंमली पदार्थ यांचा घातक परिणाम कमी करण्यात लक्षणीय यश आल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती
- भारतीय आणि श्रीलंकन नौदलाच्या संयुक्त कारवाईत ५०० किलो अंमली पदार्थ जप्त

**आणि**

- ५५ व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा काल गोव्यात समारोप

**<><><><><>**

अदानी लाच प्रकरणासह इतर मुद्यांबाबत विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळं संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात आजही अडथळे निर्माण झाले. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज चौथ्या दिवशी दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेचं कामकाज सुरु होताच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अदानी लाच प्रकरणाबाबत गदारोळ सुरु केला. विरोधी पक्षांनी घातलेल्या गोंधळामुळं राज्यसभेचं

कामकाज अपेक्षेप्रमाणे होत नसल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यसभेचं कामकाज ठप्प झाल्यानं वेळेचा अपव्यय तसंच सामान्य जनतेच्या समस्यांची हेळसांड होत असल्याबाबत नाराजी व्यक्त करून धनखड यांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. राज्यसभेच्या अधिवेशनाचं पुढचं सत्र आता २ डिसेंबरला होणार आहे.

लोकसभेचं कामकाज सुरू होताच काँग्रेस, डीएमके आणि समाजवादी पार्टीच्या खासदारांनी जोरदार घोषणाबाजी सुरु केली. या गदारोळातही सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराच्या तासावरची चर्चा सुरु ठेवली. मात्र विरोधी पक्षाच्या सदस्यांनी दाद न दिल्यामुळे बिर्ला यांनी अखेर लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

**<><><><><>**

दिल्लीत गुन्हेगारीच्या घटना वाढत असल्याचा आरोप करत आम आदमी पक्षाच्या खासदारांनी आज संसदेबाहेर निदर्शनं केली. दिल्लीतली वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी सरकारनं उपाययोजना कराव्यात असं पक्षाचे नेते संजय सिंह यांनी यावेळी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

तसंच पंजाबमधल्या काँग्रेस खासदारांनीही आज संसदेच्या आवारात निदर्शनं केली. भारतीय अन्न महामंडळ किमान आधारभूत किमतीत पिकांची खरेदी करत नसल्याचा आरोप पंजाब काँग्रेसचे प्रमुख अमरिंदर सिंग राजा वारिंग यांनी केला. त्यामुळे शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दरानं पिकांची विक्री करावी लागत आहेस, असल्याचं ते यावेळी म्हणाले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची मागणीही त्यांनी सरकारकडे केली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर आहेत. भुवनेश्वर इथं होत असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला ते उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या परिषदेचं उदघाटन होणार आहेत. या तीन दिवसीय परिषदेला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह केंद्रीय राखीव पोलीस दल, रॉ, एनएसजी आणि गुप्तचर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत देशांतर्गत संरक्षण, नवीन गुन्हेगारी कायदे, किनारपट्टी संरक्षण, सायबर गुन्हे, माओवाद्यांची दहशत तसंच अद्ययावत तंत्रज्ञानामुळे उद्भवणाऱ्या समस्यांबाबत चर्चा होणार आहे. या परिषदेच्या पार्श्वभूमीवर भुवनेश्वर सरकारनं कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे.

दरम्यान, देशातल्या युवकांना सर्वोच्च स्थानावर पोहचण्यासाठी आणि आपल्या कारकिर्दीत उत्कृष्ट प्रदर्शन करण्यासाठी सर्व आवश्यक संधी देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलं आहे. माय जी ओ व्ही हँडलवर त्यांनी हे आश्वासन दिलं. भारतीय तरुणांमध्ये कोणताही चमत्कार करण्याचं सामर्थ्य आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

भारतीय सुरक्षा दलांवर फक्त देशाच्या सुरक्षेचीच जबाबदारी नसून त्यांच्यासमोर सायबर युद्ध आणि दहशतवाद यांसारखी नवी आव्हानं देखील आहे. या आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम होणं आवश्यक आहे असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. तामिळनाडूतल्या वेलिंगटन इथल्या संरक्षण सेवा प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी, अधिकारी आणि शिक्षकांना संबोधित करताना काल त्या बोलत होत्या. आजच्या जगात वेगाने बदलणाऱ्या भू- राजनैतिक वातावरणात

सर्व प्रकारच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आपण तयार असले पाहिजे असंही राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या. राष्ट्रपती मुर्मू तामिळनाडू राज्याच्या दौऱ्यावर असून आज त्या उधग मंडलम् इथल्या राजभवनात आदिवासी भागातील बचत गटाच्या महिला प्रतिनिधींना आणि निलगिरी जिल्ह्यातल्या आदिवासी समुदायाच्या प्रतिनिधींना भेटणार आहेत. उद्या तिरूवरूर इथल्या तामिळनाडू केंद्रीय विश्वविद्यालयाच्या दीक्षांत समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

गेल्या 10 वर्षांत देशातला दहशतवाद, डावी विचारसरणी, बंडखोरी आणि अंमली पदार्थ यांचे घातक परिणाम कमी करण्यात लक्षणीय यश मिळालं आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. मसुरी इथल्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीमध्ये झालेल्या समारोप समारंभाला ते संबोधित करत होते. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या ठोस धोरणांचे अपेक्षित परिणाम झाले आहेत. 31 मार्च 2026 पर्यंत डाव्या विचारसरणीचा समूळ नायनाट केला जाईल, असं ते म्हणाले. जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, डाव्या विचारसरणीचे अतिरेकी, ईशान्येकडील बंडखोरी आणि अंमली पदार्थ ही देशासमोरील चार प्रमुख आव्हाने आहेत. 150 वर्षे जुन्या ब्रिटीशकालीन कायद्यांच्या जागी तीन नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी केल्याने दोषी सिद्ध होण्याचे प्रमाण 90 टक्क्यांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, त्यामुळे देशाची न्यायव्यवस्था जगातील सर्वात आधुनिक व्यवस्था ठरेल, असंही शहा म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्रात सरकार स्थापनेसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी काल दिल्लीत केंद्रीत गृहमंत्री अमित शहा यांसंदर्भातल्या ची भेट घेतली. सरकार स्थापनेअनेक बाबींवर यावेळी चर्चा

करण्यात आली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रांताध्यक्ष सुनिल तटकरे यावेळी उपस्थित होते. या बैठकीनंतर फडणवीस यांनी समाज माध्यमावरुन राज्यात विधानसभा निवडणुकीत केलेल्या सहकार्याबद्दल शहा यांचे आभार मानले. पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रेरित करण्याचं काम शहा यांनी केल्याचं, फडणवीस यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, ही बैठक अतिशय सकारात्मक झाली, यानंतर मुंबईत आणखी एक बैठक होणार आहे, त्यात मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

<><><><>

भारतीय नौदलाने श्रीलंकन नौदलाच्या सहकार्याने आज अरबी समुद्रात दोन मासेमारी नौकांमधून क्रिस्टल मेथ म्हणून ओळखले जाणारे सुमारे ५०० किलो वजनाचे अमली पदार्थ जप्त केले. भारतीय नौदलाने एक्स या समाजमाध्यमावर ही माहिती दिली आहे. या दोन्ही नौका आणि जप्त केलेले अंमली पदार्थ पुढील कायदेशीर कारवाईसाठी श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले आहेत.

<><><><>

५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इफ्फीचा काल गोव्यात समारोप झाला. दिग्दर्शक तथा निर्माते आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ दिवस चाललेल्या या महोत्सवात ७५ देशांमधले २०० हून अधिक चित्रपट दाखवण्यात आले. समारोप सोहळ्यात ऑस्ट्रेलियातले दिग्गज चित्रपट निर्माते फिलिप नॉय्स यांचा सत्यजीत रे जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. लिथुआनियन चित्रपट टॉक्सिक ने इफ्फीचा सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा सुवर्ण मयूर पुरस्कार पटकावला. नवज्योत बांदिवडेकर यांना ‘घरत गणपती’ या

मराठी चित्रपटासाठी भारतीय चित्रपटासाठीचा पदार्पणातला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक; पुरस्कार, मराठी वेब सिरीज ‘लंपन’ला सर्वोत्कृष्ट वेब सिरीजचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यंदाच्या इफ्फिमध्ये प्रतिष्ठित भारतीय दिग्दर्शक रमेश सिप्पी आणि प्रसिद्ध अभिनेत्री जया प्रदा यांचा त्यांच्या चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

इस्कॉन संस्थेवर बंदी घालण्याबाबत अद्याप कोणतीही चर्चा झाली नसल्याचं बांग्लादेश सरकारनं स्पष्ट केलं आहे. बांग्लादेशाच्या हंगामी सरकारचे पर्यावरण, वन आणि हवामान सल्लागार सैय्यद रिजवाना यांनी काल बातमीदारांशी बोलताना याबाबत खुलासा केला. बांग्लादेशातल्या हिंदू समाजाचे नेते चिन्मय कृष्णदास यांना एका विशेष आरोपांतर्गत अटक करण्यात आली असून त्यांच्यावर खटला सुरु असल्याचंही रिजवाना यांनी यावेळी सांगितलं. त्यांच्यावरच्या आरोपांबाबत न्यायालय अंतिम निर्णय घेणार असल्याचंही रिजवाना म्हणाले.

**<><><><>**

इस्रायलच्या हवाई दलाने काल दक्षिण लेबनॉनमधल्या हिजबुल्लाहच्या क्षेपणास्त्र तळावर हल्ला केला. हिजबुल्लाहबरोबरच्या बुधवारी लागू झालेल्या युद्धविरामाचे हे उल्लंघन आहे, असं लेबनॉनने म्हटलं आहे. बुधवारी आणि गुरुवारी इस्रायलने अनेकदा युद्धविरामाचे उल्लंघन केल्याचा आरोपही लेबनॉनने केला आहे. अमेरिका आणि फ्रान्सच्या प्रयत्नांमुळे लेबनॉन आणि इस्रायल यांच्यात 60 दिवसांचा युद्धविराम घोषित झाला आहे.